आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२७ ऑगस्ट २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- वैद्यकीय व्यावसायिकांच्या सुरक्षेबाबत सर्वोच्च न्यायालयानं स्थापन केलेल्या राष्ट्रीय कृती दलाची पहिली बैठक आज नवी दिल्लीत होणार

- बदलापूर प्रकरणाच्या चौकशी समितीचा प्राथमिक अहवाल महाराष्ट्र शासनाला सादर
- सार्वजनिक तक्रारींचं तत्परतेनं आणि सुलभपणे निवारण व्हावं यासाठी केंद्राकडून मार्गदर्शक सूचना जारी

**आणि**

- श्रीकृष्णजन्मोत्सव सर्वत्र साजरा / महाराष्ट्रात आज दहिहंडीचा थरार

**<><><><><>**

वैद्यकीय व्यावसायिकांची सुरक्षा तसंच कामाच्या ठिकाणची परिस्थिती याबाबत सर्वोच्च न्यायालयानं स्थापन केलेल्या राष्ट्रीय कृती दलाची पहिली बैठक आज नवी दिल्लीत होणार आहे. या बैठकीचे अध्यक्ष केंद्र सरकारचे कॅबिनेट सचिव असतील. दलाच्या इतर सदस्यांमध्ये केंद्रीय गृह सचिव, राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे अध्यक्ष, सर्जन, व्हॉईस ॲडमिरल, एम्सचे संचालक आणि न्यूरोलॉजी विभागाचे माजी प्राध्यापक यांचा समावेश आहे. कोलकात्यातल्या राधागोविंद कार वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात एका महिला निवासी डॉक्टरवर लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणाची सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयानं, वैद्यकीय व्यावसायिकांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी राष्ट्रीय कृती दलाची स्थापना केली होती.

**<><><><><>**

महाराष्ट्रात बदलापूर इथल्या लैंगिक अत्याचार प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभागाने नेमलेल्या शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग आणि राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्ष यांच्या समितीचा प्राथमिक अहवाल शासनास सादर झाला आहे. या अहवालातील निरीक्षणं तपास यंत्रणांना सादर करण्यात येणार असून शिक्षण विभागाअंतर्गत स्वतंत्र हेल्पलाईन सुरू करण्यात येणार असल्याचं शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितलं. दोषी ठरलेल्यांना पाठिशी घातले जाणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. महिलांवर अत्याचार रोखण्यासाठी मोबाईलवर पॅनिक बटन देता येईल, यासाठी महिला आणि बालविकास तसंच गृहविभागामार्फत निर्णय घेण्यात येणार आहे. राज्यातील सर्व शाळांमध्येही असं बटण देता येईल, यासाठी निर्णय घेतला जाईल, असंकेसरकर यांनी सांगितले.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या राजकोट किल्ल्यावरचा पुतळा कोसळण्याचं कारण शोधण्यासाठी आणि पुतळा पुनर्स्थापित करण्यासाठी एक पथक रवाना करण्यात आल्याची माहिती भारतीय नौदलानं एका निवेदनाद्वारे दिली आहे. या संदर्भात राज्य सरकार आणि तज्ज्ञांच्या सहकार्यानं काम सुरू असल्याचं नौदलानं म्हटलं आहे. राजकोट किल्ल्यावरला छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५ फुटांचा पुतळा काल कोसळला. त्यानंतर नौदलानं आज हे निवेदन जारी केलं.

<><><><><>

B P R D अर्थात पोलीस संशोधन आणि विकास विभागाच्या ५४ व्या स्थापना दिनाच्या सोहळ्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह उद्या नवी दिल्लीत सहभागी होतील. यानिमित्तानं आयोजित डॉ. आनंद स्वरुप गुप्ता स्मृती व्याख्यानमालेत ‘नवीन फौजदारी कायदेः नागरीककेंद्रित सुधारणा’ या विषयावर शाह व्याख्यान देतील. यावेळी ते विशिष्ट सेवा आणि गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती

पदकप्राप्त झालेल्यांचा गौरव करतील. तसंच नवीन फौजदारी कायदे या विषयावरल्या इंडियन पोलीस जर्नल या विशेषांकाचं प्रकाशन करतील.

**<><><><>**

भारत आणि ब्राझील यांच्यात आज होणाऱ्या ९व्या संयुक्त आयोग बैठकीचं अध्यक्षपद परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि ब्राझीलचे परराष्ट्र मंत्री मौरो वीईरा संयुक्तपणे भुषवतील. मौरो वीईरा हे चार दिवसांच्या भारत भेटीवर आले आहेत. त्यांच्या भेटीमुळे भारत आणि ब्राझीलमधल्या राजनैतिक संबंधांना चालना मिळेल, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

ब्राझील यावर्षी होणाऱ्या जी २० परिषदेचं अध्यक्षपद भूषवणार आहे. ब्राझीलच्या या अध्यक्षपदाच्या काळात तीन गटांच्या समूहात भारत, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिकेचा समावेश आहे. भारत आणि ब्राझील यांच्यात अनेक वर्षांपासूनचे संबंध असून वीईका यांच्या भेटीमुळे हे संबंध अधिक दृढ होणार असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><>**

जम्मू काश्मिर विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रशासित प्रदेशात तयारी सुरु आहे. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे पूंछ इथून सुरणकोट, मेंढार आणि हवेली विधानसभा मतदारसंघातल्या स्ट्राँग रूममध्ये सुरक्षितपणे पोहोचवण्यात आली आहेत. यावेळी निवडणूक अधिकारी आणि विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या विधानसभा मतदारसंघांमध्ये दुसऱ्या टप्प्यात २५ सप्टेंबरला मतदान होणार असून ४ ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे.

**<><><><>**

राज्यातल्या राज्यसभेतच्या दोन जागांवर धैर्यशील पाटील आणि नितिन पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे. महाराष्ट्र विधीमंडळानं प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे.

**<><><><><>**

श्रीकृष्णाचा जन्मसोहळा म्हणजेच गोकुळाष्टमी काल देशभरात मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावानं साजरी झाली. मथुरेसह देशभरातल्या सर्वच मंदिरांमध्ये तसेच राज्यातल्या विविध मंदिरांमध्ये गोकुळाष्टामीनिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले. महाराष्ट्रात आज दहिकाल्याचा सण उत्साहात साजरा होत असून विशेषतः मुंबई, ठाण्यात ठिकठिकाणी गोविंदाचा थरार रंगणार आहे. अनेक दिवसाच्या सरावानंतर गोविंदा मंडळे उंचच उंच बांधलेल्या दहीहंड्या फोडत आहेत. या दहीहंड्यांसाठी लाखो रुपयांची बक्षिसेही लावण्यात आलेली आहेत. सहा ते आठ थरांचे हे मानवी मनोरे पाहण्यासाठी जागोजागी गर्दी झाली आहे. आधिक माहिती आमच्या वार्ताहराकडून…

**व्हॉईस कास्ट- अंकिता**

परदेशातही अनेक ठिकाणी श्रीकृष्ण मंदिरांमधे कृष्णजन्मोत्सव साजरा झाला. दुबई येथील बर दुबई भागातल्या श्रीकृष्ण मंदिरात काल जन्माष्टमीचा सण उत्साहात साजरा झाला. श्रीनाथजी हवेली या नावाने प्रसिद्ध असलेल्या या मंदिरात हजारो भारतीयांनी हजेरी लावली.

**<><><><><>**

नागरिकांच्या तक्रारींचं ठराविक कालमर्यादेत, सुलभपणे आणि योग्यरीत्या निवारण व्हावं या उद्देशानं केंद्रानं सार्वजनिक तक्रारींच्या हाताळणीबाबत सर्वंकष मार्गदर्शक तत्त्वं जारी केली आहेत. याअंतर्गत नागरिकांना आपल्या तक्रारी www.pgportal.gov या संकेतस्थळावर नोंदवता येणार असून त्यांच्या तक्रारींचं त्यावरच एक खिडकी स्वरुपात निवारण केलं जाणार आहे. सार्वजनिक तक्रारींचं तातडीनं आणि योग्य पद्धतीनं आणि कार्यक्षमपणे निवारण करण्यासाठी केंद्र सरकारची सर्व मंत्रालयं आणि विभागांना नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक करणं बंधनकारक असणार आहे. पुरेशा संसाधनांसह सर्व योजना आणि त्यासंबंधित

घडामोडींची माहिती असलेल्या यंत्रणेसह केवळ तक्रार निवारणासाठी समर्पित विभाग सुरू करावेत, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. या मार्गदर्शक नियमावलीनुसार तक्रारी मार्गी लावल्यानंतर त्याची नागरिकांना एसएमएस किंवा ईमेलद्वारे माहिती द्यावी लागणार आहे.

**<><><><><>**

गुजरातमध्ये गेले दोन दिवस सातत्याने पडणाऱ्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. **अहमदाबाद, बडोदा, सुरत आणि नवसारीला** पावसाचा सर्वाधिक फटका बसला आहे. राज्यातल्या राष्ट्रीय महामार्गांसह सुमारे ५०० रस्त्यांवरची वाहतूक ठप्प झाली आहे. सखल भागातल्या सुमारे १७ हजार रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे. राज्यातली ५० हून अधिक धरणं भरून वाहत आहेत. आणंद मार्गे जाणाऱ्या सर्व रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी गांधीनगर इथल्या आप्तकालीन साहाय्य केंद्रात उच्चस्तरीय बैठक घेऊन राज्यातल्या पूरस्थितीचा आढावा घेतला. राज्यातल्या प्राथमिक शाळा आज बंद आहेत.

महाराष्ट्रातही अनेक भागात मुसळधार पावसामुळे नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे.

**कोल्हापूर** जिल्ह्यात **राधानगरी, गगनबावडा, आजरा आणि चंदगड** तालुक्यात अतिवृष्टी झाली असून, धरण क्षेत्रातही जोरदार पाऊस होत आहे. सर्वच धरणे पूर्ण क्षमतेने भरली असल्याने, पाण्याचा विसर्ग वाढल्याने नद्यांच्या पातळीत झपाट्याने वाढ होत आहे. **पंचगंगा** नदीचं पाणी पात्राबाहेर आल्यानं ४२ बंधारे पाण्याखाली गेले आहेत.

**//<><><><><>//**

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -  दुपारी १.३० वाजता

२७ ऑगस्ट २०२४ - मंगळवार